सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

## कार्यालय पोलीस आयुक्त, नागपुर शहर

## पोलीस भवन, वेस्ट हायकोर्ट रोड, सिव्हिल लाईन्स, नागपुर - ४४०००१

दुरध्वनी क्र. - 0712–2590601, ई.मेल - cp.nagpur@mahapolice.gov.in

क्रमांक : पोआना/आस्था/सआलि-५/का.शि२०२४-२५/ले.अ./२०२६- 377 नागपुर शहर दिनांक 01 /05/२०२६

प्रति,

पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(लक्षवेध : संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई)

**विषय:-** कारागृह शिपाई भरती २०२४-२५
लेखी चाचणीसाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांच्या अंतिम सुचीबाबत.

----००००----

सादर आहे की, पोलीस आयुक्तालय, नागपुर शहर या घटकाचे अंतर्गत कारागृह उपमहानिरीक्षक, पुर्व विभाग, नागपुर यांचे आस्थापनेवरील सन २०२४-२५ मधील रिक्त असलेल्या १३० **"कारागृह शिपाई"** या पदासाठी दिनांक ११/३/२०२६ ते २४/४/२०२६ या कालावधीतील वेळापत्रकानुसार शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी प्रक्रिया घेण्यात आलेली आहे. तसेच वरील वेळापत्रकानुसार शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी करीता अनुपस्थित राहिलेल्या उमेदवारांकरीता एक शेवटची संधी म्हणून, पुरुष उमेदवारांना दिनांक १३/४/२०२६ रोजी व महिला उमेदवारांना दिनांक २४/४/२०२६ रोजी व तृतीयपंथी उमेदवारांची दिनांक २४/४/२०२६ रोजी शारिरीक चाचणी परेड मैदान, पोलीस मुख्यालय, नागपुर शहर येथे घेण्यात आलेली असुन शारिरीक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांची तात्पुरती संबंधीत प्रवर्गामधील जाहिरातीत नमुद केलेल्या रिक्त पदाच्या १:१० या प्रमाणात लेखी परीक्षेसाठी तात्पुरती निवड यादी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीवर उमेदवारांनी घेतलेल्या आक्षेप/हरकती विचारात घेवुन लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवांराची अंतिम निवड यादी उमेदवारांसाठी असलेल्या सुचनांच्या प्रतिसह यासोबत जोडुन पाठविण्यात येत आहे.

तरी कारागृह शिपाई पदाच्या लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम यादी महाराष्ट्र पोलीस दलाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

**सहपत्र:-** लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम निवड यादी
व उमेदवारांसाठी सुचना

( दीपक अग्रवाल )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे करीता

प्रत माहीतीस,

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई.

प्रत,

व्यवस्थापक, महाआयटी, मुंबई.

२/- कृपया या सोबत जोडलेले "कारागृह शिपाई भरती २०२४-२५ मधील लेखी परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम यादी व उमेदवाराकरीता सुचना" महाआयटी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात याव्यात.

प्रत,

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पो.स्टे, नागपुर शहर.

२/- या सोबत जोडलेले "कारागृह शिपाई भरती २०२४-२५ मधील लेखी परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम यादी व उमेदवाराकरीता सुचना" नागपुर पोलीस आयुक्तालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत आजच तात्काळ कार्यवाही करावी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# कार्यालय पोलीस आयुक्त,नागपूर शहर
## पोलीस भवन, वेस्ट हायकोर्ट रोड,सिव्हील लाईन्स, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712–2590601, ई-मेल- cp.nagpur@mahapolice.gov.in

क्रमांक:पोआना/आस्था/सआली-५/पो.शि.भरती-२०२४-२५/लेखी परि./२०२६-377 नागपूर शहर दिनांक 9/5/२०२६

## कारागृह शिपाई भरती २०२४-२५
## लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम यादी बाबत उमेदवारांसाठी सुचना

पोलीस आयुक्तालय, नागपुर शहर यांचे अंतर्गत कारागृह उपमहानिरीक्षक, पुर्व विभाग, नागपुर यांचे आस्थापनेवर रिक्त असलेल्या **"कारागृह शिपाई"** यांचे १३० पदासाठी दिनांक ११/३/२०२६ ते २४/४/२०२६ पर्यंत वेळापत्रकानुसार शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणीची भरती प्रक्रिया घेण्यात आलेली आहे. वेळापत्रकानुसार दिनांक ११/३/२०२६ ते २४/४/२०२६ या कालावधीत शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी करीता अनुपस्थित राहिलेल्या उमेदवारांकरीता एक शेवटची संधी म्हणून, पुरुष उमेदवारांना दिनांक १३/४/२०२६ रोजी व महिला उमेदवारांना दिनांक २४/४/२०२६ रोजी व तृतीयपंथी उमेदवारांची दिनांक २४/४/२०२६ रोजी शारिरीक चाचणी परेड मैदान, पोलीस मुख्यालय, नागपुर शहर येथे घेण्यात आलेली आहे. सदर शारिरीक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार याना संबंधीत प्रवर्गामधील जाहिरातीत नमुद केलेल्या रिक्त पदाच्या १:१० या प्रमाणात लेखी परीक्षेसाठी पात्र करण्यात आले आहे. सदरहु लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची तात्पुरती यादी **गॅस गोडाउन, प्रवेश व्दार पोलीस मुख्यालय, नागपूर शहर** येथील नोटीस बोर्डवर व पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे www.nagpurpolice.gov.in या संकेतस्थळावर, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर तसेच महाआयटी यांचे policerecruitment2025.mahait.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

दिनांक २९/४/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या यादीवर काही आक्षेप/हरकत असल्यास cp.nagpur.dcp.hq@mahapolice.gov.in यावर लेखी स्वरुपात किंवा प्रत्यक्षरित्या पोलीस भवन, तिसरा माळा-समाधान कक्ष,नागपूर शहर येथे येउन दिनांक ३०/४/२०२६ चे सायंकाळी २०:०० वा. पर्यत सविस्तर आक्षेप कारणासह नोंद करण्याबाबत सुचित करण्यात आले होते.

तद्नंतर दिनांक ३०/४/२०२६ रोजी कारागृह शिपाई पदाच्या लेखी परिक्षेकरीता तात्पुरते पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या यादी बाबत दिनांक ३०/४/२०२६ चे सायंकाळी २०:०० वाजेपर्यन्त प्राप्त झालेले सर्व आक्षेप/हरकती विचारात घेवून कारागृह शिपाई या पदाकरीता लेखी परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम यादी **गॅस गोडाऊन प्रवेश व्दार पोलीस मुख्यालय, नागपूर शहर** येथील नोटीस बोर्डवर व पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे www.nagpurpolice.gov.in या संकेतस्थळावर,पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर तसेच महाआयटी यांचे policerecruitment2025.mahait.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

( दीपक अग्रवाल ) भा.पो.से.
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे करीता

E:\ALL POLICE BHARTI\PB 2024-25\PRISON 24-25\PRISON CORROS..DOCX9